निलय बरडे. वय: १७ वर्ष

# राजूची फ्लोरीडा ट्रीप

राजू बर्फातील शहरातल्या घरात रहात होता. तो आपल्या घरात खूप आनंदी होता. तो बर्फात खूप खेळायचा, आइस-स्केटिंग करायचा, स्नो-बोर्डिंग करायचा, स्नो-बॉल फाइट करायचा. पण तो फ्लोरीडा सारख्या गरम शहराचे पण स्वप्न बघायचा. एक दिवस त्याला फ्लोरीडाचा जाण्याचा चान्स आला. तो खूप आनंदी झाला. जाण्याच्या दिवशी तो आई बाबांच्या सोबत विमानतळावर गेला. तिथे खूप विमानं बघून त्याला खूप मजा आली व तो विमानात बसायची आतुरतेने वाट बघू लागला. तो क्षण आला. विमानात तो खिडकीत जाऊन बसला. विमान सुरू झाले तो धावपट्टी बघू लागला. त्याला खूप मजा आली. तो पहिले ऑरलँडोतल्या डाऊनटाऊनला गेला. तिथे हवेचा मोठा फुगा बघून खूप आनंदी झाला. फुग्यात बसायची आई बाबांकडे खूप घाई करू लागला. थोड्यावेळाने फुग्यात बसला. फुगा वर वर उडू लागला तसे तसे खालील सगळे छोटे छोटे दिसू लागले. वरून तो सर्वांना आवाज देऊ लागला. त्याला खूप मजा आली. दोन-तीन दिवसांनी तो आपल्या घरी वापस आला. त्याला फ्लोरीडा खूप आवडले पण त्याला सर्वात जास्त आपल्या घरी आल्याचा आनंद झाला.




Nilay Barde